dailyloknisht@gmail.com

दैनिक

# लोकनिष्ठ

LOK NISHT

संपादक - युनुस खान

कार्यकारी संपादक - अमजद खान

● दैनिक ● छ.संभाजीनगर ● वर्ष-४ ● अंक - ११३ ● मंगळवार दि. २२ सप्टेंबर २०२६ ● पाने - ८ ● किंमत २.०० रू.

RNI - MAHMAR/2023/87332

# मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी कायदेशीर लढ्यास गती देणार -विनोद पाटील




**✻ विनोद पाटील हे छत्रपती संभाजीनगरमधील 'अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान'चे संस्थापक असून मराठा आरक्षणाच्या न्यायालयीन लढयातील प्रमुख याचिकाकर्ते आहेत. महाराष्ट्र सरकारने २०२४ मध्ये दिलेले १० टक्के मराठा आरक्षण मुंबई उच्च न्यायालयाने कायम केले होते. त्यांनंतर या निर्णयांविरोधात प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. पाटील यांच्या कायदेशीर टीमने अनेक पुरावे सादर केले असून, न्यायालयीन प्रक्रियेत लढा सुरू आहे...**

**✻ मुख्यमंत्र्यांच्या भेटीमध्ये कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे विनोद पाटील यांनी सांगितले, ''मी गेल्या अनेक वर्षापासून मराठा आरक्षणासाठी न्यायालयात लढत आहे. यापुढे ही लढाई अधिक गतिमान करणार आहे,'' असे ते म्हणाले.**

**✻ मनोज जरांगे पाटील यांनी २० दिवसांपासून सुरू असलेले उपोषण गुरूवारी (१७ सप्टेंबर) सकाळी मागे घेतले. उपोषण सोडल्यानंतर विनोद पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले. ''आता आम्ही कोर्टात लढाई लढू आणि कायद्याने विजय मिळवू,'' अशी भूमिका त्यांनी मांडली. मराठा आरक्षणाचा प्रश्न न्यायालयीन मार्गाने पुढे नेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

**छत्रपती संभाजीनगर** - मराठा आरक्षण याचिकाकर्ते विनोद पाटील यांनी समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी आपण कायदेशीर लढा देऊ, असे सांगत पुन्हा मैदानात उतरले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या पूर्वसंध्येला विनोद पाटील यांच्या प्रतिष्ठानच्या गणेशोत्सवात सहभागी होत आरती केली.

यानंतर दुसऱ्याच दिवशी पहाटे बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण सरकारला तीन महिन्याची मुदत देत स्थगित केले होते. या पार्श्वभूमीवर विनोद पाटील यांनी मराठा आरक्षणाविषयीची आपली भूमिका, सरकारकडून अपेक्षा आणि जरांगे पाटील यांच्या लढ्यावर पत्रकारांशी संवाद साधला. मराठा समाजासाठी केंद्रात ईडब्लूएस, राज्यात ईसीबीसीचे आरक्षण लागू आहे. या शिवाय कुणबी प्रमाणपत्र ज्यांच्याकडे आहे त्यांना आरक्षण मिळते. परंतु इतरांचे काय? हा प्रश्न कायम आहे. कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे सरकट मराठवाड्यात आरक्षण मिळू शकत नाही हे आता स्पष्ट झाले आहे. सरकार न्यायालयीन लढाईला बगल देत आहे. खरेतर सरकारने यावर आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे, असेही विनोद पाटील म्हणाले.

मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी आपण अनेक वर्षापासून न्यायालयीन लढा देत आहोत. आता पुन्हा एकदा कायदेशीर लढाई लढण्यासाठी पूर्ण ताकदीने आपण सज्ज झालो आहोत. मुंबई उच्च न्यायालयात होणाऱ्या महत्त्वाच्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही भूमिका मांडली. मनोज जरांगे पाटील यांनी त्यांच्या पद्धतीने प्रामाणिक प्रयत्न केले आणि कुणबी नोंदी शोधण्याचा मुद्दा लावून धरला. परंतु ज्यांच्या नोंदी मिळाल्या त्यांचे काम झाले, मग ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्या उर्वरित मराठा समाजाचे काय? हा मोठा प्रश्न कायम आहे. हैदराबाद गॅझेट पूर्णपणे लागू झालेले नाही, ती केवळ एक पुस्तिका होती हे मी आधीच स्पष्ट केले होते.

सरकारने पूर्ण गॅझेट लागू केल्याशिवाय सर्वांना प्रमाणपत्रे मिळू शकत नाहीत. त्या मुळे ज्यांच्या नोंदी नाहीत, त्यांना कायदेशीर मार्गाने न्याय मिळवून देणे हाच आमचा मुख्य उद्देश असल्याचे विनोद पाटील यांनी सांगितले. एकाच समाजात केंद्रात ईडब्लूएस आणि राज्यात एसईबीसी अशी स्थिती असल्याने विद्यार्थी प्रचंड गोंधळात आहेत. पोलिस भरतीमध्ये मराठा तरुणांचा टक्का फार कमी असल्याचे सांगत याकडे सरकारचे दुर्लक्ष असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. सध्या मोठ्या प्रमाणावर प्रवेश प्रक्रिया सुरू असल्याने सरकारने तातडीने याकडे लक्ष द्यावे, अशी मागणीही विनोद पाटील यांनी केली.

## कोंढवा खुर्द-कौसरबाग व्यापारी आणि हॉटेल असोसिएशनच्या बैठकीत विविध समस्या, प्रश्नावर आणि प्रलंबित मागण्यांवर चर्चा




**पुणे (दैनिक लोकनिष्ठ अमजद खान)** - पुण्यातील कोंढवा खुर्द-कौसरबाग व्यापारी आणि हॉटेल असोसिएशनच्या वतीने व्यापारी व हॉटेल व्यावसायिक बांधवांच्या विविध समस्या, प्रश्न आणि प्रलंबित मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पुणे शहर काँग्रेस अध्यक्ष प्रशांतदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली आयोजित या बैठकीस उपस्थित राहून व्यापारी आणि हॉटेल व्यावसायिक बांधवांशी संवाद साधला. त्यांच्या विविध समस्या जाणून घेत, व्यापारी व हॉटेल व्यावसायिक बांधवांच्या हितासाठी तसेच त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. यावेळी मोहसिन शेख, हाजी तौसीफ, आसिफ शेख यांच्यासह स्थानिक मान्यवर तसेच कौसरबाग परिसरातील व्यापारी आणि हॉटेल व्यावसायिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. व्यापारी आणि हॉटेल व्यावसायिक बांधवांच्या प्रश्नांसाठी आणि त्यांच्या हक्कांसाठी सदैव ठामपणे प्रयत्नशील राहू असे आश्वासित यावेळी करण्यात आले.

# मोकाट कुत्र्यांचे हल्ले रोखण्यात प्रशासन अयशस्वी! लाखो प्रकरणे, आरोग्य व्यवस्थेसमोर एक आव्हान

**मुंबई –** महाराष्ट्रातील मोकाट कुत्र्यांची समस्या आता केवळ रस्ते आणि सार्वजनिक जागांपुरती मर्यादित राहिलेली नाही. राज्यातील वाढत्या संख्येने लोक कुत्र्यांच्या हल्ल्यांना बळी पडत आहेत. नाशिकमध्ये मोकाट कुत्र्यांविरोधात सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान प्रसिद्ध झालेल्या सरकारी आकडेवारीने संपूर्ण महाराष्ट्रातील कुत्रा चावण्याच्या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधले आहे. २०२१ ते २०२५ या कालावधीत राज्यात ४७,३७,००० लोकांना कुत्र्यांनी चावा घेतला. ही आकडेवारी माहिती अधिकार कायद्याअंतर्गत प्राप्त झालेल्या माहितीवर आधारित आहे. याच कालावधीत कुत्रा, मांजर आणि माकड यांच्या चाव्यामुळे होणाऱ्या रेबीजमुळे १३४ मृत्यूंची नोंद झाली.मुंबईत कुत्रा चावण्याच्या घटना सर्वाधिक आहेत. गेल्या पाच वर्षांत मुंबईत ५,२९,६५० लोकांना कुत्र्यांनी चावा घेतला आहे.

**पाच वर्षांत ४७ लाख लोकांवर कुत्र्यांचा हल्ला,१३४ जणांचा रेबीजने मृत्यू –** मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या महानगरात, रस्त्यांवर, गल्ल्यांमध्ये, बाजारपेठांमध्ये आणि निवासी भागांमध्ये मोकाट कुत्र्यांच्या वावरामुळे नागरिकांच्या सुरक्षेबद्दल सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. आता, समोर आलेल्या माहितीने मोजता येण्याजोग्या परिणामांसह ही चिंता पुन्हा एकदा समोर आणली आहे. प्राणी चावण्याच्या घटनांमध्ये फक्त कुत्रेच सामील नसतात. राज्यात मांजरी आणि माकडांनीही मोठ्या संख्येने लोकांना चावा घेतला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कुत्र्याच्या चाव्या मुळे ४७,३७,७६३ लोक प्रभावित झाले.४,६६,३९२ लोकांना मांजरींनी चावा घेतला.माकडांच्या हल्ल्यात ४३,९५५ लोक जखमी झाले.या प्राण्यांच्या चाव्यामुळे रेबीजने १३४ लोकांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. नाशिकमध्ये मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या समस्येविरोधात झालेल्या आंदोलनानंतर, या आकडेवारीमुळे राज्यव्यापी चर्चेला सुरुवात झाली आहे. नागरिकांना मोकाट कुत्र्यांपासून वाचवणे आणि संपूर्ण महाराष्ट्रात रेबीजचा प्रतिबंध करणे या मुद्द्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी, हे आंदोलन आता स्थानिक पातळीवरून देशव्यापी मोहिमेत विस्तारले आहे.

गेल्या पाच वर्षांत ४७ लाखांहून अधिक झालेली कुत्र्यांच्या चाव्यांची संख्या, ही समस्या मोठ्या प्रमाणावर नागरिकांना प्रभावित करत असल्याचे दर्शवते. कुत्रा चावल्यानंतर वेळेवर वैद्यकीय उपचार आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे. यासोबतच, भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण, त्यांचे लसीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्रभावी व्यवस्था करण्याची गरज, हे देखील या संपूर्ण समस्येचा एक महत्त्वाचा भाग आहे. नाशिक आंदोलनानंतर समोर आलेल्या या आकडेवारीमुळे, मोकाट कुत्र्यांचे हल्ले रोखण्यात आणि रेबीजमुळे होणारे मृत्यू कमी करण्यात राज्य आणि स्थानिक प्रशासनाची सध्याची व्यवस्था किती प्रभावी आहे, यावर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

राज्यातील भटक्या कुत्र्यांवर नसबंदी कार्यक्रम आक्रमकपणे राबवा असे आदेश हायकोर्टानं राज्य सरकारला दिले आहेत. निरपराध



नागरिकांवर कुत्र्यांचे जीवघेणे हल्ले होत असताना राज्य सरकार मूक प्रेक्षक बनून केवळ बघ्याची भूमिका घेऊन राहू शकत नाही, या शब्दांत हायकोर्टाने राज्य सरकारची खरडपट्टी काढलीय. नागरिकांवर होणारे कुत्र्यांचे हल्ले पाहता सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांनुसार मुंबई उच्च न्यायालयाने यासंदर्भात सुमोटो याचिका दाखल करून घेतलीय. हायकोर्टाने या याचिकेवर शुक्रवारी झालेल्या सुनावणीत राज्य सरकारला चांगलेच खडे बोल सुनावले होते. समस्येच्या मुळावर वेळेतच घाव घातला तर समस्या नियंत्रणात आणणं अधिक सोप जाईल, असे यावेळी हायकोर्टाने अधोरेखित केले होते.मात्र या वर ठोस कारवाई होत नसल्याने भटक्य कुत्र्यांच्या दिवसेंदिवस वाढत चाललेल्या हल्ल्यांची प्रकरणे वाढत चालले आहे. एकीकडे सुप्रीम कोर्ट आणि हायकोर्टाचे कडक निर्देश असताना, दुसरीकडे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (महानगरपालिका व नगरपालिका) भ्रष्टाचार आणि नियोजनाचा अभाव यामुळे भटक्या कुत्र्यांची समस्या दिवसेंदिवस उग्र रूप धारण करत आहे.

**कुत्र्यांच्या नसबंदीतही पैसे खाल्ले प्रशासनावर आरोपांच्या फेरी –** कुत्र्यांच्या नसबंदी शस्त्रक्रियेत (निर्बिजीकरण) घोटाळा झाल्याचा आरोप नेहमीच प्रशासनावर होत आहे. अटी–शर्तीनुसार निर्बीजीकरण केलेल्या श्वानाचे छायाचित्र काढणे गरजेचे असताना छायाचित्रे काढली गेली नाहीत. पालिकेने बोगस बिलाच्या आधारावर पैसे दिले, असा आरोप करीत या भ्रष्टाचारात गंभीर आरोप केला जात आहे.

भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यास जबाबदार कोण? वाघ बकरी चहाचे संचालक पराग देसाई यांच्यावर भटक्या कुत्र्यांनी काही वर्षांपूर्वी हल्ला केला होता. अहमदाबादमधील घराबाहेरील कुत्र्याने त्यांचा चावा घेतला आणि त्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. कुत्र्याच्या हल्ल्यात पडल्यानंतर त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ब्रेन हॅमरेजमुळे अहमदाबाद येथील रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला होता. अशी अनेक घटना राज्यात घडलेली आहे.

दरम्यान या भटक्या कुत्र्यांची टोळी लहान मुलांवर, येणाऱ्या जाणाऱ्यांवर आणि जेष्ठ नागरिकांवरही हल्ला करते. भटक्या कुत्र्यांनी लोकांचा बळी घेण्याची किंवा त्यातून मृत्यू ओढवण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. अलीकडच्या काळात पाळीव प्राण्यांनीही माणसांवर हल्ला केल्याच्या अनेक घटना शहरात चर्चेत आल्या आहेत.

भटके कुत्रे वेडे, भुकेले किंवा त्यांच्या पिल्लांची संरक्षण करण्यासाठी तत्पर असू शकतात. अशा परिस्थितीत, कुत्रे पिसाळले किंवा भडकले की माणसावर हल्ला करू शकतात. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे कुत्रा चावणे, रेबीज आणि सतत भुंकण यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागू शकते. भटक्या कुत्र्यांचे हल्ले थांबवण्याकडे आणि उपाययोजना करण्याकडे सरकारचे आणि प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसते.

भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवण्यात सरकार अपयशी ठरले आहे. प्राणी कल्याण संस्था आणि नागरी समाज गटांचा दृष्टिकोन उदासीन आणि दुर्लक्षित राहिला आहे. भटक्या प्राण्यांची काळजी घेणाऱ्या मूठभर व्यक्तींना अनेकदा अविश्वसनीय उपहास आणि प्रतिकाराचा सामना करावा लागतो. लोक त्यांना हीन वागणूक देतात आणि नको नको ते बोलतात. कायद्यानुसार, रस्त्यांवरून कुत्रे हटवणे बेकायदेशीर असून कुत्र्यांना परिसरातून पळवून लावता येत नाही. त्यामुळे एकदा कुत्रा रस्त्यावर आला की त्याला कोणी दत्तक घेईपर्यंत तिथे राहण्याचा अधिकार त्याला आहे. भारतात २००१ पासून कुत्र्यांना मारण्यावरही बंदी घालण्यात आली आहे. भारताच्या सुप्रीम कोर्टाने २००८ मध्ये मुंबई हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली, ज्यात उपद्रव माजवणाऱ्या कुत्र्यांना मारण्याची परवानगी पालिकांना द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेच्या कलम ५१() नुसार, वन्यजीवांचे संरक्षण करणे आणि सर्व सजीव प्राण्यांबद्दल सहानुभूती बाळगणे हे भारतातील प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. भटक्या कुत्र्यांना खायला देणे हे कायदेशीर आहे. सुप्रीम कोर्टाने दिल्ली हायकोर्टाचा मागील आदेश कायम ठेवला होता, ज्यात रहिवाशांना त्यांच्या परिसरातील भटक्या कुत्र्यांना खायला देण्याची परवानगी दिली गेली होती.

# कोंढवा पोलिसांची धडकबेवाज कारवाई,जबरदस्तीने मोबाईल हिसकावणारे जेरबंद, ६ मोबाईलसह ६० हजारांचा मुद्देमाल जप्त

**पुणे (अमजद खान) –** कोंढव्यात जबरदस्तीने मोबाईल हिसकावून फरार झालेल्या दोघांना कोंढवा पोलिसांनी जेरबंद केले आहे. दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९१/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०९, ३ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तक्रारदार हे कोंढवा येथील कमला परिसरातील सुमरास प्राईम हॉस्पिटलसमोर व्हिडिओ कॉलवर बोलत असताना दोन अनोळखी इसम दुचाकीवरून आले आणि त्यांच्या हातातील मोबाईल जबरदस्तीने हिसकावून कोंढव्याच्या दिशेने पसार झाले होते.

घटनेनंतर कोंढवा तपास पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेतला. याप्रकरणी सफी उल्ला हाफीज उल्ला शहा (वय १८ वर्षे) आणि मेहताब जलालुद्दीन चौधरी (वय २० वर्षे) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. आरोपींकडून एकूण ६ मोबाईल फोन, किंमत सुमारे ६० हजार रुपये, तसेच एक मोपेड हस्तगत करण्यात आली आहे.



# काजू-बदाम खाणाऱ्यांचे सालपट काढली पाहिजे - अंबादास दानवे

**पुणे** – मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागात दुष्काळ पडल्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. त्यांच्या घरात दिव्याला तेल नाही, अशा परिस्थितीत राज्यकर्ते दुष्काळ आढावा बैठकीत काजू-बदाम खात आहेत. सत्ताधारी असंवेदनशील असल्याची टीका विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते, शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी केली. तसेच अल्पोपहार करण्यास हरकत नाही. परंतु, काजू-बदाम खाणाऱ्यांची नागरिकांनी हातात हंटर, रुमणे घेऊन सालपट काढली पाहिजे, असा संतापही त्यांनी व्यक्त केला. आमदार दानवे यांनी शनिवारी पिंपरी-चिंचवड शहरातील विविध गणेश मंडळे, शिवसेना शाखा, पदाधिकारी, ज्येष्ठ शिवसैनिकांच्या गाठीभेट घेतल्या. त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या उपस्थितीमध्ये नांदेडमध्ये बैठक झाली. या बैठकीत खासदार संजय जाधव यांची काजू-बदाम खातानाची चित्रफीत प्रसारित झाली आहे. 'दुष्काळामुळे शेतकरी आत्महत्या करत असून त्यांच्या घरात दिव्याला तेल नाही, अशा परिस्थितीत राज्यकर्ते दुष्काळ आढावा बैठकीत काजू-बदाम खात आहेत. असे लोकप्रतिनिधी लोकांनी निवडून दिले आहेत, हे आपल्या राज्याचे दुर्दैव आहे. बैठकीत अल्पोपहार करण्यास हरकत नाही. परंतू, काजू-बदाम खाणा-यांची नागरिकांनी हातात हंटर, रुमणे घेऊन सालपट काढली पाहिजे. तसेच गोरे इंग्रज नागरिकांवर अन्याय करत होते, त्याप्रमाणे सरकारमधील काळे-गोरे इंग्रजासारखच वागत असल्याचा आरोपही दानवे यांनी केला. असंवेदनशील लोकप्रतिनिधी लोकांनी निवडून दिले आहेत, हे आपल्या राज्याचे दुर्दैव आहे. गोरे इंग्रज नागरिकांवर अन्याय करत होते, त्याप्रमाणे सरकारमधील काळे-गोरे इंग्रजासारखच वागत असल्याचा आरोपही दानवे यांनी केला. 'राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. विविध भागात दुष्काळ पडला आहे. या दुष्काळापासून मुक्ती मिळू दे, धो-धो पाऊस येऊ दे. आणि शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना जनतेने नेस्तनाभूत करू दे, अशी गणराया चरणी प्रार्थना केली असल्याचे आमदार दानवे म्हणाले.

**''बैठक शेतकऱ्यांसाठी होती, काजू-बदाम खाण्यासाठी नव्हे,''** – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे नांदेडला दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी गेले होते. यावेळी बैठकीत लोकप्रतिनिधींना काजू आणि बादाम देण्यात आल्याने वादंग निर्माण झाले आहे. राज्यात दुष्काळ पडलाय आणि लोकप्रतिनिधी काजू, बादामवर ताव मारून शेतकऱ्यांची चेष्टा करत आहेत, अशी टीका विरोधकांकडून होत आहे. विरोधकांच्या या टीकेचा राज्याच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी खरपूस समाचार घेतला आहे. त्या बैठकीला लोकप्रतिनिधी काय बादाम, काजू खाण्यासाठी गेले नव्हते. ती बैठक काय काजू, बादामासाठी घेतली होती का? असा संतप्त सवाल पंकजा मुंडे यांनी केला आहे. यावेळी त्यांनी विरोधकांना हा सवाल केला आहे. कोणत्याही बैठकीची एक व्यवस्था असते. बैठकीत चहापाणी, काजू, बादाम दिले जातात. काही गोष्टी सर्व्ह केल्या जातात. तिथे कोणी काही काजू, बादाम खाण्यासाठी जात नाही. आम्ही काही काजू, बादाम खाण्यासाठी जात नाही. मूळात काजू, बादाम हा काही महत्त्वाचा विषय नाही. बैठक शेतकऱ्यांसाठी होती. तो विषय महत्त्वाचा आहे. काजू बादामासाठी बैठक घेतली का? चहापाणी दिल्याने त्याचा इश्यू करू नये, असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.



राज्य सरकार दुष्काळ कधी जाहीर करणार? असे त्यांना विचारण्यात आले. त्यावरही त्यांनी राज्य सरकारची भूमिका स्पष्ट केली. दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी केंद्राचे पथक येते. केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून हे काम करते. आम्ही निवडणुका नसताना वीजमाफी केली. कर्जमुक्ती दिलीच ना? शेतकऱ्यांना आमच्यावर विश्वास आहे. आम्ही जागरुक राहून उपाययोजना करत आहोत. ३२ हजार कोटींची कर्जमाफी, वीजबील माफी दिली आहे. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त पीक कसे घेता येईल, बी बियाणे कसे पोहोचू शकू हा आमचा प्रयत्न आहे. पण निसर्गाने पाठ फिरवली आहे. त्यामुळे आम्ही शेतकऱ्यांच्या मागे आहोत. अन्न धान्य, चारा आणि पाण्याची व्यवस्था करत आहोत, असे पंकजा यांनी स्पष्ट केले. एनडीआरएफचे काही नियम आहेत. त्यात परतीच्या पावसाच्या कधीपर्यंत पंचनामे करायचे हे ठरलेले आहे. पण त्यावर आम्ही थांबलेलो नाही. कृषी मंत्र्यांनी आढावा घेतला आहे. मी जालना आणि बीडमध्ये जाऊन पाहणी करणार आहे. पंचनामे आज आणि आठ दिवसाने केल्याने फरक पडणार नाही. आम्ही आधीच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी काम सुरू केले आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**काजू बदाम वादावर भरणेंचा खुलासा** – नांदेड येथे झालेल्या दुष्काळ आढावा बैठकीदरम्यान लोकप्रतिनिधींनी काजू बदाम खाल्ल्याच्या आरोपामुळे निर्माण झालेल्या वादावर आमदार दत्तात्रय भरणे यांनी स्पष्टीकरण दिले आहे. ''बैठकीत मला काजू बदाम दिसले नाहीत,'' असे भरणे यांनी म्हटले आहे. या प्रकारावर टीका करणाऱ्या विरोधकांना त्यांनी प्रत्युत्तर दिले. दत्तात्रय भरणे यांच्या म्हणण्यानुसार, नांदेडमधील दुष्काळाच्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी ही बैठक चार तास चालली. ते स्वतः या बैठकीत एका खुर्चीवरून हल्ले नाहीत. बैठकीच्या कालावधीत ७६ तालुक्यांच्या प्रतिनिधींची उपस्थिती होती. जर कुणी आमदार किंवा खासदार यांनी काजू बदाम खाल्ले असतील, तर कदाचित ते मधुमेहाचे रुग्ण असतील किंवा त्यांना इतर काही आरोग्याच्या समस्या असतील. अशा परिस्थितीत त्यांच्या आरोग्याशी संबंधित गोष्टींवर आरोप करून राजकारण करणे योग्य नाही, असे भरणे यांनी नमूद केले. त्यांच्यासमोर तरी काजू बदाम आले नव्हते आणि त्यांनी ते पाहिलेही नाहीत, असे त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांनी कुणाच्याही आरोग्याच्या मुद्द्यावर आरोप करून राजकारण करू नये, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

**कृषीमंत्री भरणेंना शेतकऱ्यांचा घेराव** – राज्यात शेतकरी दुष्काळजन्य परिस्थिती मुळे अडचणीत सापडला आहे. दुष्काळामुळे हातातोंडाशी आलेले पीक जळून गेले आहे. या मुळे शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली आहे. या पार्श्वभूमीवर नांदेडमधील आयोजित बैठकीत मंत्री आणि आमदारांसमोर काजू, बादाम ठेवण्यात आले होते. यावरून राज्यभरात संतापाची लाट पसरली आहे. या बैठकरीच्या व्हिडिओवर कृषीमंत्री दत्ता भरणे यांनी पहिली प्रतिक्रिया दिली. कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी वसमत तालुक्यातील टाकळगाव शेत शिवारात नुकसानग्रस्त सोयाबीनची पाहणी केली. शेतीच्या बांधावर गेल्याशिवाय परिस्थितीचे गांभीर्य कळत नाही, असे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले. यावेळी काजू-बादामाच्या व्हायरल व्हिडिओवर भरणे म्हणाले, 'आमच्यासमोर काजू-बदामची प्लेट आली नव्हती. बैठक चार तास चालल्यामुळे टीममधील एखाद्या प्रतिनिधीला साखर असल्यामुळे कुणी घेतले असेल'. शेतकऱ्यांच्या सम स्येवर भरणे म्हणाले, शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत करणे ही आपली जबाबदारी आहे. हा प्रश्न माझ्या दृष्टीने नवा आहे. तुमच्या भावना समजून घेतो. या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कानावर भावना घालतो. तुमच्या भावना तीव्र आहेत'.

'हे सरकार नुकासानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे आहेत. एनडीआरएफची मदत घेऊच. शासन, विम कंपन्या, कर्जमाफी करणाऱ्या योजना असतील, जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मदत करू. शेतीची पाहणी करण्यासाठी आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत अनेक आमदार, खासदारांनी मते मांडली. सर्व खासदारांनी शेतकरी कसा अडचणीत आहे, त्याबद्दल सांगितले. मी आश्वासित करतो की, पीक जळाले आहे. हातचे पीक गेले. पिकावर अनेक स्वप्न रंगवली होती. परंतु निश्चितपणे स्वप्न भंग झाले आहे. या अडचणीच्या काळात जितकी मदत करता येईल, यासाठी मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतले आहेत. आम्ही पण शेतकऱ्यांसोबत आहोत. आपण निसर्गाच्या पुढे नाही. हे मानवनिर्मित संकट आहे. नैसर्गिक संकट आहे. त्याला सामोरे जावे लागेल. राज्य सरकार म्हणून जितकी मदत शक्य आहे, तितकी मदत करू. परंतु शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही'.

सोशल मीडियावर दुष्काळासंदर्भात ही यादी फिरत आहे. त्यात वसमत तालुका वगळ्याचे सांगितले जात आहे. यावर कृषीमंत्री भरणे म्हणाले, ही दिशाभूल करणारे वृत्त आहे. ही फेक बातमी आहे. अशी कोणतीही यादी काढली नाही. हे खोटे वृत्त कोण पसरवत आहे, याची चौकशी केली जाईल'. तर हिंगोलीत चारा टंचाई निर्माण झाली आहे. यावर भरणे म्हणाले, भविष्यात पशुधनाला चारा कमी पडणार नाही. आमच्या पिण्याच्या पाण्याबाबत अडचण येणार नाही. याबाबत जिल्हाधिकाऱ्यांना नियोजन करण्यास सांगितले आहे'.

**संजय जाधव काजू, बदामावार ताव मारताना ...** नुकतेच ठाकरेंच्या शिवसेनेतून शिंदेंच्या शिवसेनेत आलेले खासदार संजय जाधवही यावेळी काजू, बदामावार ताव मारताना दिसले. बैठकीनंतर खासदार संजय जाधवांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी याबाबत प्रश्न विचारला, तर जाधवांचा पारा चढला. दुष्काळ आहे म्हणून काजू बदाम खायचे नाही का? असा उलट प्रश्न जाधवांनी विचारला. काजू बदाम खायला मी माणूसच आहे ना. करा टीका. दुष्काळ आहे म्हणून खायचे नाही का? असा तर्क त्यांनी मांडला.

यावर काजू बदाम खाण्यात काही चूक नाही. पण संवेदनशीलता नावाचा काही प्रकार असतो की नाही, असा सवाल विरोधकांकडून केला जातोय. शिंदेंच्या शिवसेनेत आलेले खासदार संजय जाधव उलट माध्यमांवर राग काढतायत, अशी टीकाही विरोधकांकडून केली जातेय. संजय जाधव यांचा काजू, बदाम खातानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ संतापले आहेत. त्यांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेचे आसूड ओढले आहेत. राज्यातील शेतकरी उपाशी आहे. मात्र मंत्री, खासदार तुपाशी आहेत. लोकप्रतिनिधींनी काजू बदाम खाऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे, असा हल्लाबोल हर्षवर्धन सपकाळ यांनी केला.

## संपादकीय

### समीकरणाचे राजकारण !

पश्चिम बंगालमधील राजकारणाने महाराष्ट्रासह इतर राज्याचेही लक्ष वेधले आहे. पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी नंदिग्राम विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार मिलन प्रधान यांना पाठिंबा दिला आहे. तृणमूल काँग्रेस आपल्या सर्वात गंभीर संघटनात्मक संकटाचा सामना करत असताना, या निर्णयाला राज्यातील विरोधी राजकारणासाठी महत्त्व आहे. कोलकाता येथे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांची भेट घेतल्यानंतर त्यांच्या गटाच्या उमेदवार संचिता प्रधान डे यांनी नंदिग्राम पोटनिवडणुकीतून आपली उमेदवारी मागे घेतल्यावर ममता बॅनर्जी यांनी प्रधान यांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम बंगालमधील नंदिग्राम आणि रेजीनगर विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीसाठी ६ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे. तृणमूल काँग्रेसमधील अंतर्गत कलहाच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने पक्षाचे पारंपरिक नाव आणि गवताच्या फुलांची जोडी' हे निवडणूक चिन्ह तात्पुरते गोठवले आहे. आयोगाने पोटनिवडणुकीसाठी ममता गट आणि अरूप रॉय गटाला वेगवेगळी पक्षाची नावे आणि निवडणूक चिन्हे दिली आहेत. १८ सप्टेंबर रोजी प्रधान यांना पाठिंबा जाहीर करताना, ममता यांनी काँग्रेसला 'मित्रपक्ष आणि नैसर्गिक भागीदार' म्हटले होते. त्यांनी सांगितले की, हा निर्णय देशाच्या व्यापक हितासाठी आणि विरोधी आघाडी, इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्लुझिव्ह अलायन्स (इंडिया) मजबूत करण्यासाठी घेण्यात आला आहे. मात्र, या निर्णयाच्या वेळेचे स्पष्ट धोरणात्मक परिणाम आहेत. ममता गटाने सुरुवातीला नंदिग्राममधून आपला स्वतःचा उमेदवार उभा केला होता आणि संचिता यांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्यानंतरच निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला. ममता बॅनर्जी यांचा काँग्रेस पक्षाला असलेला पाठिंबा हा भाजप विरोधी मतांचे विभाजन रोखण्याचा प्रयत्न आणि त्यांच्या गटासाठी अत्यंत कठीण काळात दिलेला राजकीय प्रतिसाद, असे दोन्ही आहे. ममता बॅनर्जी यांच्या घोषणेनंतर लगेचच २००७ च्या नंदिग्राम जमीन आंदोलनाशी संबंधित एका प्रकरणात प्रधान यांना अटक होऊन तुरुंगवास झाल्याने या घडामोडीचे राजकीय महत्त्व आणखी वाढले. ममता बॅनर्जी यांनी १९९० च्या दशकाच्या उत्तरार्धात काँग्रेस पक्षातून फुटून तृणमूल काँग्रेसची स्थापना केली होती. डाव्या आघाडीला आव्हान देण्यासाठी त्यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली होती. ममता बॅनर्जी यांचा असा विश्वास होता की, भारतीय कम्युनिस्ट पक्षाला (मार्क्सवादी) विरोध करण्यात काँग्रेस पक्ष पुरेसा प्रभावी ठरत नाही. असे असूनही, एखाद्या मोठ्या राजकीय प्रतिस्पर्ध्याचा सामना करताना हे दोन्ही पक्ष अधूनमधून एकत्र आले आहेत. ममता बॅनर्जी राष्ट्रीय लोकशाही आघाडीतून बाहेर पडल्यानंतर, काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने २००१ ची पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक एकत्र लढवली आणि २००९ च्या लोकसभा निवडणुकीतही एकत्र आले. ही युती २०११ मध्ये शिखरावर पोहोचली, जेव्हा काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेसने मिळून पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीचे ३४ वर्षांचे राज्य संपुष्टात आणले. तथापि, धोरणे, जागावाटप आणि राज्य सरकारच्या कामकाजावरून वाढत्या मतभेदांमुळे ही भागीदारी नंतर संपुष्टात आली. काँग्रेस आणि तृणमूल दोन्ही पक्ष आपले राजकीय अस्तित्व वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत आणि युतीमुळे कोणत्याही पक्षाला सावरण्यास मदत होणार नाही. ममता बॅनर्जी यांचा काँग्रेसचे उमेदवार पाठिंबा मिळणे म्हणजे राज्यातील विरोधी राजकारणात नव्या समीकरणाची निर्मिती होण्याचे संकेत देऊ शकतो.

## नाशिक कुंभमेळ्याच्या आढावा बैठकीत महागोंधळ

# महाजनच्या उपस्थितीत प्रशासकीय अधिकारी आणि आखाड्याच्या महंतांमध्ये खडाजंगी!




**नाशिक** – ३१ ऑक्टोबर रोजी नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्याच्या पूर्वतयारीची आढावा बैठक शनिवारी कुंभ प्राधिकरणाच्या कार्यालयात पार पडली. मात्र ही बैठक वादा मुळे गाजली आहे. कुंभमेळामंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या बैठकीत 'त्र्यंबकराजा'च्या प्रतिकृतीवरून प्रशासकीय अधिकारी आणि आखाड्याच्या महंतांमध्ये खडाजंगी पाहायला मिळाली.

पुढील वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यानिमित्त त्र्यंबकेश्वर येथील धरण आणि घाटावर 'त्र्यंबकराजा'ची भव्य प्रतिकृती साकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शनिवारी साधू महंत लोकप्रतिनिधी मंत्री गिरीश महाजन आणि शासकीय अधिकारी यांच्यासोबत पार पडलेल्या आढावा बैठकीत या प्रतिकृतीचे एक लहान प्रारूप सादर करण्यात आले.मात्र,या प्रतिकृतीवरील मुखवट्याला 'त्रिपुंड' (महादेवाचा गंध) लावण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले. यानंतर जुना आखाड्याचे महंत हरिगिरी महाराज तीव्र संतापले. त्यांनी थेट प्रशासनाला धारेवर धरत ''कुंभमेळ्याच्या कामात दुजाभाव केला जात आहे'' तसेच कुंभमेळ्याच्या लोगो बाबतही आखाड्याना विश्वासात घेतले जात नसल्याचा गंभीर आरोप केला. संतापलेल्या हरिगिरी महाराजांनी बैठक सोडून जाण्याचा निर्णय घेतला. परंतु, उपस्थित इतर साधू–महंतांनी त्यांची मध्यस्थी करून समजूत काढली. यानंतर महंत हरिगिरी महाराज शांत झाले आणि बैठक पूर्ववत सुरू झाली.

बैठक सुरू झाल्यानंतर सर्वच साधू महंतांनी समस्यांचा पाढा वाचला तसेच काही सुचनासुद्धा केल्या. ध्वजारोहणापूर्वी रामकुंड व कुशावर्त खुले करावे. ध्वजारोहण सोहळ्यामुळे स्थानिकांना अडचण होणार नाही, याची काळजी घ्यावी. राम कुंड–कुशावर्त परिसरात नव्याने खोदकाम करू नये. नदीघाट व शाही मार्गावरील अतिक्रमणे हटवावीत. रस्ते व अन्य कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण, आरोग्य यंत्रणेचे सक्षमीकरण, वाहनतळ (पार्किंग), वस्त्रांतरगृहे आणि स्वच्छतागृहांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी साधू–महंतांनी प्रशासनाला भाविकांच्या सोयी–सुविधा अग्रक्रमाने पूर्ण करण्याचे आवाहन केले.

**काय आहेत मागण्या?**

त्र्यंबकेश्वरमधील नवीन कुंड परिसरात आवश्यक सुविधा द्याव्यात. नवीन कुंडात साधू–महंतांच्या स्नानाची व्यवस्था करावी. ध्वजारोहणापूर्वी रामकुंड व कुशावर्त खुले करावे. भाविकांसाठी दोन हजार खोल्या उभाराव्यात. खोल्यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आखाडे घेण्यास तयार आहेत. ध्वजारोहण सोहळ्यामुळे स्थानिकांना अडचण होणार नाही, याची काळजी घ्यावी. रामकुंड–कुशावर्त परिसरात नव्याने खोदकाम करू नये. नदीघाट व शाही मार्गावरील अतिक्रमणे हटवावीत. रस्ते व अन्य कामे प्राधान्याने पूर्ण करावीत. या बैठकीत त्र्यंबकेश्वर आणि सप्तशृंगी देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण, आरोग्य यंत्रणेचे सक्षमीकरण, वाहनतळ (पार्किंग), वस्त्रांतरगृहे आणि स्वच्छतागृहांच्या नियोजनावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी साधू–महंतांनी प्रशासनाला भाविकांच्या सोयी–सुविधा अग्रक्रमाने पूर्ण करण्याचे आवाहन केले.

''साधू–महंतांचा कुंभमेळ्याच्या नियोजनाला कोणताही विरोध किंवा आक्षेप नाही. त्र्यंबकराजाची प्रतिकृती बसवण्याबाबत प्रशासनाने महंतांना आधीच विश्वासात घेऊन माहिती दिली असती, तर हा वाद टळला असता. हा अंतर्गत विषय असून यावरून कोणताही गैरसमज पसरवण्याची गरज नाही. नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा हा जगभरात सर्वांत उत्कृष्ट ठरेल, असा विश्वास सर्व साधूंनी व्यक्त केला आहे,'' असे स्पष्टीकरण देऊन बैठकीत झालेल्या गदारोळानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकारांशी बोलताना परिस्थिती सावरून घेण्याचा प्रयत्न केला. माजी महापौर दशरथ पाटील यांनी आपले म्हणणे मांडताना घेतलेली आक्रमक भूमिका तसेच महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांचे कडक उत्तर या प्रकाराची बैठकीनंतर चर्चा रंगली.

बैठकीत माजी महापौर दशरथ पाटील यांनी नियोजनाच्या मुद्यावरुन प्रशासनाचे वाभाडे काढले. आपण अनेक कुंभमेळे पाहिले असून असा गलथान कारभार यापूर्वी कधीही पाहिला नसल्याची टीका करत तुम्हाला हिंदू धर्माचे महत्व नसल्याचे त्यांनी सांगितले. महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनीही पाटील यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. तुम्ही धार्मिक भावनांच्या बाबतीत सांगू नका, असे त्यांनी खडसावले. वाद अधिक वाढत असल्याचे पाहून पंचवटी भाजप मंडळाचे अध्यक्ष राहुल कुलकर्णी यांनी मध्यस्थी केल्यानंतर शांतता झाली. बैठकीला प्रमुख नेत्यांची उपस्थिती कुंभमेळा प्राधिकरणाच्या कार्यालयात झालेल्या या बैठकीस महापौर हिमगौरी आडके–आहेर, खासदार डॉ. शोभा बच्छाव, खासदार भास्कर भगरे, खासदार राजाभाऊ वाजे, त्र्यंबकेश्वरच्या नगराध्यक्ष त्रिवेणी तुंगार यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू–महंत आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

# शेतकरी उपाशी तर लोकप्रतिनिधी तुपाशी'

## नेतेमंडळीचा काजू-बदामावर ताव, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले, वाह रे सरकार!

**नांदेड /छत्रपती संभाजीनगर** – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी नांदेडमध्ये दुष्काळी आढावा बैठक झाली आहे. या दुष्काळी बैठकीत एक संतापजनक प्रकार समोर आला. दुष्काळासारख्या संवेदनशील मुद्द्यावर नेतेमंडळी आणि अधिकाऱ्यांनी चर्चा करण्याआधी चक्क काजू बदामावर ताव मारला. शेतकऱ्यांप्रति दाखवलेल्या असंवेदनशीलमुळे राज्य सरकारवर टीकेची झोड उठली आहे. अधिकारी– नेतेमंडळींनी शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे, अशा संतप्त भावना राज्यभरातून व्यक्त केल्या जात आहे.

एकीकडे नैसर्गिक आपत्ती आणि दुष्काळामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झालेला असताना मदतीच्या आशेने त्यांनी सरकारकडे डोळे लावले आहेत. मात्र, त्याच वेळी दुष्काळी परिस्थितीची पाहणी आणि उपाययोजना करण्यासाठी आलेल्या लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांची 'शाही बडदास्त' ठेवण्यात आल्याचा अत्यंत संतापजनक प्रकार नांदेडमध्ये समोर आला. नांदेड येथे राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली दुष्काळी परिस्थितीची गंभीर आढावा बैठक पार पडली. मात्र, दुष्काळासारख्या अत्यंत संवेदनशील आणि गंभीर विषयावर चर्चा सुरू होण्यापूर्वीच बैठकीला उपस्थित असलेले लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चक्क काजू, बदाम आणि ड्रायफ्रूट्सवर ताव मारला.

शेतात पीक करपल्यामुळे आणि हाता तोंडाशी आलेला घास हिरावल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा वेळी त्यांच्या समस्यांवर गांभीर्याने मार्ग काढण्याऐवजी बैठकीत नेते आणि अधिकाऱ्यांकडून दाखवण्यात आलेल्या असंवेदनशीलतेमुळे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. घटलेला पाऊस, भूगर्भातील घटलेली पाण्याची पातळी त्यामुळे शेतीपिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.संपूर्ण मराठवाड्यात भीषण दुष्काळी परिस्थिती ओढावली आहे. पाण्याच्या तीव्र तुटवड्यामुळे मराठवाड्यातील बळीराजा पुन्हा संकटात सापडला आहे. सोयाबीन, कापूस, तूर यांसारखी मुख्य पिके शेतातच करपून गेली आहेत. अनेक भागात दुबार पेरणीचा खर्च करूनही शेतकऱ्यांच्या हाती निराशा आली आहे.

विहिरी आणि कूपनलिकांच्या पाण्याची पातळी खालावल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. अनेक गावांत टँकरने पाणीपुरवठा करावा लागण्याची शक्यता आहे. तसेच, जनावरांसाठी चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्यामुळे पशुपालकही चिंतेत आहेत. पीकं वाया गेल्यामुळे पेरणी, खते आणि मजुरीवर झालेला खर्चही वसूल झालेला नाही. यामुळे बँक आणि सावकारांचे कर्ज कसे फेडायचे, या विवंचनेत शेतकरी अडकला आहे.

**रोहित पवार यांची सरकारवर टीका** – राज्यातील दुष्काळी परिस्थिती अतिशय गंभीर असली तरी सरकारला मात्र कुठलंही गांभीर्य नसून ते काजू-बदाम खात बसलेत राज्य शासनाने या भयावह संकटाची गंभीर दखल घेत तत्काळ विशेष अधिवेशन बोलावून दुष्काळावर विस्तृत चर्चा करून शेतकऱ्यांना दिलासा देणं गरजेचे आहे. दुष्काळ संहितेनुसार दुष्काळ जाहीर करण्याची एक पद्धत आहे. जिल्हास्तरीय समितीने पुढील महिन्याच्या ३ तारखेपर्यंत विभागीय समितीला अहवाल द्यायचा असतो, विभागीय समितीने ७ तारखेपर्यंत राज्यस्तरीय समितीला अहवाल द्यायचा असतो आणि राज्यस्तरीय समितीने १० तारखेपर्यंत मदत व पुर्नवसन सचिव यांच्याकडे अहवाल द्यायचा असतो. यानुसार जून, जुलै, ऑगस्टचा अहवाल सरकारकडे आलेला असणं अपेक्षित आहे. परंतु आम्ही प्रशासकीय स्तरावरून घेतलेल्या माहितीनुसार जुलैमध्ये पाऊस पडल्याने ही बाब गांभीर्याने घेतली गेली नाही. परिणामी, सरकार स्तरावर अशी कोणतीही आकडेवारी (डेटा) तयार नाही. ही माहिती सत्य असेल तर ही बाब अतिशय दुर्दैवी असून, बैठकींमध्ये मंत्री आणि अधिकारी हे काय फक्त काजू-बदाम खातात का? असा प्रश्न पडतो.




**प्रशासनाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत – देवेंद्र फडणवीस**

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नांदेडमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सरकारी बैठकीत नेत्यांना खाण्यासाठी काजू आणि बदामांची व्यवस्था करण्यात आल्याच्या मुद्द्यावरुन वाद निर्माण झाला आहे. याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. राज्यात शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट असताना मंत्री आणि सरकारी अधिकारी काजू, बदामावर ताव मारत असल्याच्या मुद्द्यावरुन संताप अनेकांनी व्यक्त केला होता. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना भाष्य केले. साधारणपणे आपल्याकडे पद्धत आहे बैठकांमध्ये प्रशासन ड्रायफ्रूट आणून ठेवते. अशा गोष्टी टाळल्या पाहिजे. पण जाणीवपूर्वक दुष्काळ आहे म्हणून असे कोणीतरी करतेय, हे म्हणणे योग्य नाही. पण प्रशासनाने काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत आणि संवेदनशीलपणे वागले पाहिजे, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

राज्यातील अनेक जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस नसल्याने पिके खराब झाली आहेत. उतारा कमी येईल, अशी परिस्थिती आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्वच मंत्र्यांनी याबाबत चर्चा करुन आपापल्या जिल्ह्यात आढावा घेऊन तयारी करण्याचे आदेश आपण दिले आहेत. पुढच्या आठवडाभरात आम्ही प्राथमिक आढावा आणि पंचनामे करुन मदत करु, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. दरम्यानच्या काळात कर्जमाफीचे काम सुरु आहे. तीन याद्या झाल्या आहेत, उर्वरित काम वेगाने करण्याचे प्रक्रिया सुरु आहे. सर्वतोपरी शेतकऱ्यांना तातडीची मदत केली जाईल. पिण्याचे पाणी, चाऱ्याची व्यवस्था केली जात आहे. यावेळी अल निनो संकटामुळे आपण वैरण विकास कार्यक्रम हाती घेतला होता. त्या मुळे चाऱ्याची टंचाई असेल तिकडे व्यवस्था केली जाईल. संध्याकाळच्या वेळी शेतीसाठी अतिरिक्त वीज देण्याची तजवीज केली आहे. सगळ्या भागात आपण अतिरिक्त वीज देत आहोत. ज्याठिकाणी विहिराला पाणी आहे तिथली पिकं वाचवता येतील. दुष्काळी उपाययोजना करुन शेतकऱ्यांना किमान काहीतरी दिलासा देण्याचा प्रयत्न करु, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

विरोधकांना माहिती आहे, हे सगळे जे जीआर आहेत दुष्काळाचे, त्याप्रमाणे काय करायचे आहे, त्याचे नियम आहेत. तरच एनडीआरएफचे पैसे मिळतात. पण आपण न थांबता राज्य सरकारकडून मदत करतो, त्यानंतर एनडीआरएफचे पैसे क्लेम करतो. विरोधकांना प्रत्येक गोष्टीचे राजकारण करण्याची वाईट सवय लागली आहे. पण केवळ राजकारणे करणे योग्य नाही. जिथे विहिरींना पाणी आहे, तिथे रबी पिकांचे नियोजन करता येईल. अजून ठरवले नाही, पण शक्यतो काही भाग जो प्रचंड कोरडा आहे. यावेळी सुदैवाने मोठ्या धरणांमध्ये चांगले पाणी आहे, पण मराठवाड्यातील छोटी धरणे पाणी कमी आहे, म्हणून अशा भागात पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होऊ नये, पाणी राखून ठेवावे लागते, मोठ्या धरणातही पाणी राखून ठेवले आहे. जोपर्यंत पुढचा अंदाज येत नाही तोपर्यंत राखून ठेवलेले पाणी पिण्यासाठी वापरले जाते, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**संजय शिरसाट संतापले...**

मराठवाड्यासह राज्यभरात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि करपणाऱ्या पिकांमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. दुष्काळाच्या भीषण वास्तव आणि शेतकरी संकटावर गांभीर्याने चर्चा करण्याऐवजी बैठकीला उपस्थित असलेले नेते आणि वरिष्ठ अधिकारी काजू-बदामाचा आस्वाद घेण्यात मग्न असल्याचे उघडकीस आले आहे. या संपूर्ण प्रकारचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला असून राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. संकटात सापडलेल्या बळीराजाच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्या या प्रकारावरून विरोधकांनी सत्ताधारी नेते आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांवर टीकेची झोड उठवली आहे. शेतकरी संकटात असताना अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना मात्र स्वतःच्या आदरातिथ्याचीच जास्त काळजी असल्याचा संताप सर्वसामान्यांमधून व्यक्त होत आहे. या बैठकीला ते गैरहजर होते आणि काजू बदाम प्रकरणी बोलताना शिवसेना नेते आणि मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, ''माझे पूर्वनियोजित कार्यक्रम असल्याने मी बैठकीला गेलो नाही. मी स्वतः शेतकऱ्यांना भेटायला जाणार आहे. दत्ता भरणे आपली जबाबदारी पार पाडत आहेत आणि तिथे अधिकारी उपस्थित होते. पण अधिकारीच असे काजू-बदाम आणून ठेवतात आणि बदनाम मात्र लोकप्रतिनिधी होतात,'' असेही ते म्हणाले. मी शेतकऱ्यांना भेटायला जाणार आहे. पूर्वनियोजित काही कार्यक्रम असल्याने गेलो नाही, नांदेड येथील कृषिमंत्री यांच्या बैठकीला जावेच असे नाही. दत्ता भरणे त्यांची जबाबदारी पार पडत आहेत. त्या बैठकीला अधिकारी उपस्थित आहे. अधिकारी काजू बदाम आणतात आणि बदनाम आम्ही होतो, मी विभागीय आयुक्त यांना सूचना करेल, असेही त्यांनी म्हटले आहे.

दुष्काळी परिस्थितीमुळे प्रत्येक घास शेतकऱ्याला कडू लागत असताना सत्ताधारी नेते मात्र काजू-बदाम खाण्यात मग्न होते आणि तेही दुष्काळी परिस्थितीवरील बैठकीत. असे लज्जास्पद आणि संतापजनक कृत्य केल्यानंतर खरंतर या लोकप्रतिनिधीने बळीराजाची माफी मागायला हवी होती; पण ते निष्ठुरपणे आपल्या कृत्याचे समर्थन करत आहेत.

भ्रष्टाचारास वाचा फोडणारा एकमेव दैनिक
औरंगाबाद
संपादक : युनुस खान
9890190231
www.loknisht.in
लोकनिष्ठ
पुणे कार्यालय
संपर्क : अमजद खान
9860643044

# छत्रपती संभाजीनगरात ४ हजार कोटींच्या अखंड उड्डाणपुलासाठी ४ जुने पूल पाडण्याची शक्यता, १३५ कोटींचा खर्च वाया जाणार?

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगरच्या जालना रोडवर मोठ्या प्रकल्पासाठी आधीच उभारण्यात आलेले चार जुने उड्डाणपूल पाडावे लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. शेंद्रा ते बजाजनगरपर्यंत सुमारे ४ हजार कोटी रुपयांच्या अखंड उड्डाणपुलाचे नियोजन करण्यात आले आहे. या नव्या पुलाच्या मार्गात सिडको बसस्थानक, मोंढा नाका, क्रांती चौक आणि महावीर चौक येथील जुने उड्डाणपूल येत आहेत. त्यामुळे हे चारही पूल पाडण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या पुलांसाठी आतापर्यंत सुमारे १३५ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

ज्या पुलांचे आयुष्य पुढील ८० ते १०० वर्षे लक्षात घेऊन नियोजन करण्यात आले होते, तेच पूल अवघ्या १० ते १५ वर्षांत पाडण्याची वेळ येत असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक पैशातून कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेले हे पूल आता नव्या प्रकल्पामुळे अडथळा ठरणार आहेत. त्यामुळे आधीच्या प्रकल्पांचे नियोजन आणि भविष्यातील गरजा लक्षात घेऊन काम झाले होते का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. शेंद्रा ते बजाजनगरपर्यंतचा अखंड उड्डाणपूल हा मोठा प्रकल्प असल्याने त्याच्या कामाचा जालना रोडवरील वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. जुन्या पुलांचे पाडकाम आणि त्यानंतर नव्या पुलाचे बांधकाम यामुळे या मार्गावर वाहतुकीचा ताण वाढू शकतो. जालना रोड हा शहरातील महत्त्वाचा मार्ग असल्याने वाहनचालकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागू शकतो. त्यामुळे पाडकाम आणि बांधकामाची कामे कशी केली जाणार, याकडे नागरिकांचे लक्ष आहे.

या प्रकल्पामुळे क्रांती चौकातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा मुद्दाही चर्चेत आला आहे. नव्या पुलाची रचना करताना या पुतळ्याबाबत प्रशासनाला काय निर्णय घ्यावा लागणार, याबाबतही उत्सुकता आहे. एकीकडे शहराच्या वाहतुकीसाठी मोठ्या प्रकल्पाचे नियोजन होत असताना दुसरीकडे आधीच उभारलेल्या पुलांवर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नव्या प्रकल्पाचे नियोजन करताना जुन्या पायाभूत सुविधांचा विचार किती गांभीर्याने करण्यात आला, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे.



**मराठवाड्यातील सर्वात लांब उड्डाणपूल? लवकरच निविदा होणार – संजय शिरसाट**

शहरातील वाहतूक व्यवस्थेला मोठा बदल घडवून आणणाऱ्या प्रस्तावित उड्डाणपुलाच्या कामाला आता वेग येण्याची शक्यता आहे. शेंद्रा येथून सुरू होऊन बजाजनगरमधील ओएसिस चौकाच्या पुढे जाणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी तब्बल ४ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिली. मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाची घोषणा केल्यानंतर आता त्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल म्हणजेच डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

शेंद्रापासून सुरू होणारा हा प्रस्तावित उड्डाणपूल केंब्रिजच्या पुढील भागातून पुढे जात बजाजनगर येथील ओएसिस चौकाच्या पुढे जाणार आहे. शहराच्या वाढत्या विस्ताराचा आणि वाहनांची वाढती संख्या लक्षात घेऊन हा प्रकल्प आखण्यात आला आहे. या संपूर्ण मार्गासाठी आवश्यक असलेल्या आराखड्यावर सध्या अंतिम स्वरूप देण्याचे काम सुरू असल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले. शिरसाट म्हणाले, शेंद्रा–केंब्रिज परिसरापासून सुरू होणारा हा उड्डाणपूल मराठवाड्यातील सर्वात लांब उड्डाणपूल ठरण्याची शक्यता आहे. या प्रकल्पाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली असली तरी त्याचा उल्लेख यापूर्वी अर्थसंकल्पाच्या वेळी सभागृहातही करण्यात आला होता. त्यामुळे घोषणेनंतर आता प्रत्यक्ष प्रशासकीय प्रक्रियेला सुरुवात झाल्याचे शिरसाट यांनी सांगितले.

४ हजार कोटी रुपयांचा हा मोठा प्रकल्प एकाचवेळी पूर्ण करण्याऐवजी दोन ते तीन टप्प्यांत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. प्रकल्पाचा आराखडा अंतिम करण्याचे काम सुरू असून, त्यानंतर निविदा प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.या प्रकल्पासाठीचा डीपीआर तयार झालेला असून त्यावर अंतिम हात फिरवण्याचे काम सुरू असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. येत्या तीन महिन्यांत या कामाची निविदा अर्थात टेंडर फ्लोट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रक्रिया वेगाने पूर्ण झाल्यास प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला लवकर सुरुवात होऊ शकते. सध्या अस्तित्वात असलेल्या पुलांचे काय होणार, असा प्रश्न उपस्थित झाल्यानंतर शिरसाट यांनी त्याबाबतही भूमिका स्पष्ट केली. यापूर्वी बांधण्यात आलेले पूल त्या वेळच्या गरजा आणि लोकसंख्येचा विचार करून उभारण्यात आले होते. मात्र, शहराची वाढ आणि वाहतुकीचा वाढलेला ताण पाहता हे पूल आता अपुरे ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्याचे पूल पाडून त्यांच्या जागी एका अखंड उड्डाणपुलाची निर्मिती केली जाणार असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. त्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या पुलांऐवजी एकसंध आणि सलग उड्डाणपूल उपलब्ध होणार आहे. या नव्या रचनेमुळे वाहतूक व्यवस्थेत सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेनंतर डीपीआर तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने प्रकल्पाच्या अंमलबजावणीच्या दिशेने पुढचे पाऊल पडले आहे. पुढील तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असल्याने आता या प्रकल्पाकडे संभाजीनगरकरांचे लक्ष लागले आहे. मात्र, ४ हजार कोटींच्या या मोठ्या प्रकल्पासाठी प्रशासकीय मंजुरी, निविदा आणि प्रत्यक्ष बांधकामाचा कालावधी याबाबत पुढील टप्प्यांत अधिक स्पष्टता येणार आहे.






# कलेक्टर कुठे आहेत? त्यांना बोलवा?'

## केंद्रीयमंत्री जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकावर का संतापले?

**नवी दिल्ली** – आपल्या चार दिवसांच्या दौऱ्याच्या तिसऱ्या दिवशी, केंद्रीय संचार मंत्री आणि प्रादेशिक खासदार ज्योतिरादित्य सिंधिया यांनी आतापर्यंतची सर्वात कठोर आणि आक्रमक भूमिका दाखवली. शुक्रवारी गुणा सर्किट हाऊसम ध्ये झालेल्या सार्वजनिक सुनावणीदरम्यान तक्रारदारांच्या तक्रारी ऐकत असताना, संवेदनशील मोहन बरेला प्रकरणात



बाजू मांडायला आलेल्या कुटुंबीयांचे म्हणणे ऐकण्यासाठी जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याने सिंधियांचा संताप अचानक भडकला. जिल्हाधिकारी आपल्यासोबत नसल्याचे पाहून सिंधिया अत्यंत संतापले. त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना बोलावून कडक शब्दांत ताकीद दिली, ''गाडीत बसू नका, तुम्ही दोघे माझ्या कर्तव्यावर आहात.''

घटनेनुसार, सार्वजनिक सुनावणीदरम्यान, मोहन बरेला प्रकरणातील पीडितांचे कुटुंबीय केंद्रीय मंत्री सिंधिया यांच्याकडे न्याय मागण्यासाठी आले होते. सिंधिया कुटुंबीयांची व्यथा आणि अपघाताशी संबंधित तथ्ये अत्यंत लक्षपूर्वक ऐकत होते. जेव्हा त्यांनी प्रकरणाच्या त्वरित निराकरणासाठी कलेक्टरला बोलावले, तेव्हा त्यांना कळले की गुनाचे कलेक्टर किशोर कुम ार कन्याल आणि एसपी त्यांच्या गाड्यांमध्ये बसले आहेत. हे ऐकून मंत्र्यांना राग आला. कठोर स्वरात त्यांनी अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीवर प्रश्न विचारला आणि म्हणाले, कलेक्टर कुठे आहेत? त्यांना लवकर बोलवा... गाडीत बसू नका, तुम्ही दोघे माझ्या कर्तव्यावर आहात.

घटनास्थळावरील अधिकाऱ्यांच्या उत्तरदायित्वाबाबत एक कडक आणि स्पष्ट संदेश दिला. केंद्रीय मंत्र्यांनी तात्काळ प्रशासकीय कर्मचाऱ्यांना कामाला लावले आणि मोहन बरेला प्रकरणाच्या तपशिलाची चौकशी केली. त्यांनी अधिकाऱ्यांना अपघातात सामील असलेले वाहन, अपघाताची परिस्थिती आणि आतापर्यंत पोलिसांनी केलेल्या कारवाईबद्दल थेट प्रश्न विचारले. सिंधियांनी स्पष्ट सूचना दिल्या की संपूर्ण प्रकरणाची निष्पक्षपणे आणि सखोल चौकशी केली जावी, जेणेकरून खरी परिस्थिती समोर येईल आणि पीडित कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळू शकेल. त्यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की जनतेशी संबंधित संवेदनशील बाबींम ध्ये कोणतीही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही.

केवळ एक दिवस आधी, गुणा यांचा थीम रोड आणि विकास योजना केवळ कागदावरच राहिल्याचा दावा करणाऱ्या मीडिया रिपोर्ट्सवर ज्योतिरादित्य सिंधिया यांनी मार्मिक टिप्पणी केली. पत्रकारांवर टीका करताना सिंधिया म्हणाले, ''पत्रकारांना लेख लिहिण्याची घाई असते. ते लिहितात की योजना केवळ कागदावरच राहिल्या आहेत. कधीतरी येऊन म झ्या खुर्चीवर बसा, म्हणजे तुम्हाला कळेल की एखादी योजना तयार करण्यासाठी आणि तिची अंमलबजावणी करण्यासाठी किती मेहनत लागते. जसा पुलाव एका क्षणात तयार होत नाही, तसा विकासही एका रात्रीत होत नाही. थोडा धीर धरा. जोपर्यंत ज्योतिरादित्य सिंधिया आहेत, तोपर्यंत कोणतीही योजना केवळ कागदावरच राहणार नाही.'' या समारंभात, त्यांनी ३०.४७ कोटी रुपये खर्च करून बांधण्यात येणाऱ्या ७ किलोमीटर लांबीच्या थीम रोड आणि सुशोभीकरण प्रकल्पाचे भूमिपूजनही केले.

# भिवंडीत महिलेवर सामूहिक बलात्कार, माजी आमदार व बडतर्फ पोलिसाविरुद्ध गुन्हा दाखल



**भिवंडी** – एका २२ वर्षीय विवाहित महिलेने माजी भाजप आमदार नरेंद्र पवार आणि बडतर्फ पोलीस कर्मचारी शैलेश पाटील यांच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केल्यानंतर, भिवंडीतील पाडघा पोलीस ठाण्यात त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१७ सप्टेंबरच्या पहाटे एफआयआर नोंदवण्यात आला. महिलेच्या तक्रारीनुसार, तिचा तिच्या पतीसोबत वाद सुरू होता आणि तिने मदतीसाठी पवार यांच्याकडे धाव घेतली होती. तिने आरोप केला आहे की, पवार यांनी वाद मिटवण्यास मदत करण्याच्या बहाण्याने तिला त्यांच्या कार्यालयात बोलावले आणि नंतर १३ सप्टेंबर रोजी तिला भिवंडीतील बापगाव येथील एका खाजगी मालमत्तेवर नेले. महिलेने आरोप केला आहे की, पवार आणि पाटील यांनी तिला शस्त्राचा धाक दाखवून दारू पिण्यास भाग पाडले आणि त्यानंतर तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. तिच्या तक्रारीनुसार, पवार पहाटे २ वाजण्याच्या सुमारास घटनास्थळावरून निघून गेले, त्यानंतर पाटील यांनी तिच्यावर कथितपणे अत्याचार केला. तिला पहाटे ४ वाजण्याच्या सुमारास घरी परत नेण्यात आल्याचे वृत्त आहे.

त्या महिलेने १६ सप्टेंबर रोजी काँग्रेस नगरसेविका कांचन कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना कथित घटनेबद्दल सांगितले. तिने कुलकर्णी यांना काही व्हिडिओ आणि व्हॉट्सॲप चॅट्सही दाखवले, जे तिच्या दाव्यानुसार या घटनेशी संबंधित होते. त्यानंतर कुलकर्णी त्या महिलेसोबत पाडघा पोलीस ठाण्यात गेले, जिथे तिची तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी आरोपीवर भारतीय न्याय संहितेच्या (बीएनएस) कलम ६४(१), ७०(१), ३५१(२) आणि ३(५) सह अनेक कलम ांखाली, तसेच शस्त्र कायद्याच्या संबंधित तरतुदींखाली गुन्हा दाखल केला आहे. हे आरोप तक्रारीचा भाग असून ते न्यायालयात सिद्ध झालेले नाहीत. पोलीस या प्रकरणाचा तपास करत असून पुढील तपशिलाची प्रतीक्षा आहे.


Dr.Rahim H.Khan
B.A.M.S., M.D.
Cell : 9890882182, 9373757674
Mughal
Ayurvedic Clinic
Near harsool water tank, jatwada road Chatrapati Sambhajinagar-431001
Time: 8.00 pm to 11.00 pm
Sunday Closed


# १३५ कोटींचा बँक फसवणूक महाघोटाळा, मुंबईसह छत्रपती संभाजीनगरमध्ये ईडीची धाड

**छत्रपती संभाजीनगर** – छत्रपती संभाजीनगरमध्ये १३५ कोटींच्या कथित बँक फसवणूक प्रकरणात ईडीची मोठी कारवाईची समोर आली आहे. गजानन गंगामाई इंडस्ट्रीज एलएलपी' आणि तिच्या भागीदारांशी संबंधित मुंबई आणि छत्रपती संभाजीनगरम धील ६ निवासी आणि व्यावसायिक ठिकाणांवर ईडीने छापेमारी केली आहे. या कारवाईत कोट्यवधी रुपयांची बीएमडब्ल्यू कार आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त करण्यात आली आहेत. तसेच इंडियन बँकेच्या सिंगापूर शाखेतील सुमारे ३५.७१ कोटी रुपयांची मुदत ठेव गोठवण्यात आली आहे.

बँकेच्या तक्रारीनंतर सीबीआय ने २ जून २०२३ रोजी या प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर सीबीआय च्या आरोपपत्राच्या आधारे ईडीने आर्थिक गैरव्यवहाराचा तपास सुरु केला. बँकांकडून घेतलेला कर्जनिधी ठरवून दिलेल्या व्यवसायासाठी न वापरता बनावट आणि शेल कंपन्यांच्या माध्य मातून वळवण्यात आल्याचा आरोप ईडीने केला आहे. तसंच या निधीतून रोख रक्कम काढून पैशांचा मूळ स्रोत लपवण्याचा प्रयत्न झाल्याचेही ईडीने म्हटले आहे.

दरम्यान अंमलबजावणी संचालनालयाने चंदीगड, हैदराबाद आणि पुण्यातील बनावट कॉल सेंटरवर कारवाई केली. ईडी आणि अमेरिकन सिक्रेट सर्व्हिसकडून ही कारवाई करण्यात आली. ईडी आणि अमेरिकेतील सीक्रेट सर्व्हिसने ही कारवाई केली आहे. हैदराबाद आणि पुण्यातील चार बनावट कॉल सेंटरवर छापा टाकला आहे. तर हैदराबादमध्ये बनावट डॉलर वाटपाचे रॅकेटही आढळून आले. पुण्यातही हाच प्रकार समोर आला.

पटियाला, पुणे आणि चंदीगडमध्ये ईडीने धडक कारवाई केल्याने सायबर गुन्हेगारी वर्तुळात खळबळ उडाली. पटियालाम धील दोन आणि पुण्यातील एका बनावट कॉल सेंटरचा पर्दाफाश झाला. ईडीने छापा घातला, तेव्हा इथे २२० जण काम करत होते. अमेरिकन नागरिकांना खोटी कारणे देत फसवण्यात येत होते. त्यांची लूट करण्यात येत होती असे तपासात समोर आले आहे. याप्रकरणी ईडीने ६६ मोबाईल, १३ लॅपटॉप, हार्ड डिस्क, इतर उपकरणे, रोकड आणि कागदपत्रे जप्त केली आहेत. डॉलर भारतीय रुपयांमध्ये रुपांतरीत करण्यासाठी कोण कोण मदत करत होते याचा तपास सुरू आहे. त्यादृष्टीने तपास सुरू आहे. पटियाला येथील एका घरातून कॉल सेंटर चालवल्या जात होते.

# प्रॉपटी डीलरकडून सव्वा दोन लाखांची एमडी ड्रग्ज जप्त

## अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाची धडाकेबाज कारवाई

**छत्रपती संभाजीनगर** – शहरात जमिनी अन् घरांची खरेदी–विक्री करणारा, हायप्रोफाइल वर्तुळात वावरणारा एक 'प्रॉपर्टी डीलर'च थेट एमडी ड्ग्ज तस्कर बनल्याचे उघडकीस आले आहे.

प्रॉपर्टीचे ब्यबहार करणारा हात एमडीच्या पुड्यांकडे बळला 'अन नारळीबागेत पोलिसांच्या सापळ्यात अडकला विक्रीसाठी आणलेले ५१ ग्रॅम २९ मिलीग्रेम एमडी ( मेफेड्रोन), किंमत २ लाख ५३ हजार ८७० रुपये, अंमली पदार्थ प्रतिबंधक पथकाने जप्त केले, नदीम इब्राहिम शेख (४० रा. उमर टॉवर. गणेश कॉलनी) याला अटक करण्यात आली असून, त्याला मंबईच्या बांद्रा येथून एमडी पुरविणाऱ्या जाकेर झवेरी याचाही गुन्ह्यात सहमाग समोर आले आहे. गोपनीय माहितीच्या आधारे अंमलीपदार्थ प्रतिबंधक पथकाने गरुवारी रात्री नारळीबागेत सापळा रचला. रात्रो दहा वाजच्या सुमारास नदीम शेख संशयास्पदरीत्या आढळून आला त्याची झडती घेतली असता एमडीचा साठा सापडला, पोलिसांनी तत्काळ त्याला ताब्यात घेत अंमली पदार्थ जप्त केले. नदीम शेख हा प्रॉप्टी डीलर असून, पदवीपर्यत शिक्षण झाले आहे. तो स्वतः एमडीचे सेवन करतो आणि त्याचबरोबर त्याची बिक्रीही करीत असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली आहे, गेल्या पाच–सहा महिन्यांपासन तो अंमली पदार्थाच्या विक्रीत उतरल्याचे त्याने सांगितले. अशी माहिती पोलीस उपनिरीक्षक उत्तरेश्वर मुंढ यांनी दिली.



ही कारवाई पोलीस आयुक्त प्रवीण पवार उपायुक्त ( गुन्हे) शशिकांत सातब, सहायक आयक्त ( गन्हे) मजहर सय्यद आणि गन्हे शाखेने निरीक्षक गजानन कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सचिन जाघव, उपनिरीक्षक उत्तरेश्वर मुंढ, हवालदार भावसिंग चव्हाण, 'नारायण पायघन, सतीष जाधव, छाया लांडगे, देशराज मोरे, सरताज पठाण, विशाल मेटे, बिठ्ठल पवार आदीनी केली.

**मुंबई कनेक्शन चौकशीत उघड** – चौकशीत शेखने एमडीचा माल मुंबईतील बांद्धा येथील जाकेर झवेरी याच्याकडून आणल्याचे पोलिसांना सांगितले. त्यामुळेया प्रकरणाला थेट मुंबई कनेक्शन असल्याचे स्पष्ट झाले आहे, शेखने आतापर्यत किती बेळा मंबईतन माल आणला, शहरात कोणाला विक्री केली आणि त्याच्या संपर्कात आणस्वी कोण आहेत, याचा तपास सुरू आहे.

# पुणे – कोंढव्यात देशी बनावटीच्या पिस्तुलासह सराईत गुन्हेगाराला अटक

**पुणे (अमजद खान)** – देशी बनावटीचे पिस्तूल बाळगल्या प्रकरणी कोंढवा पोलिसांनी एका सराईत गुन्हेगाराला अटक केली. त्याच्याकडून देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक काडतूस जप्त करण्यात आले आहे.

अमन जमील खान (वय २७, रा. सुप्रीम लिगा सोसायटी, इनामनगर, कोंढवा खुर्द) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, खान हा डिलिव्हरी बॉय म्हणून काम करतो. त्याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

१८ सप्टेंबर रोजी कोंढवा परिसरात पोलिसांचे पथक गस्त घालत होते. यावेळी तपास पथकातील पोलीस कर्मचारी पुष्पेंद्र चव्हाण आणि केशव हिरवे यांना खान हा साईबाबानगर परिसरात थांबला असून त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून खान याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे देशी बनावटीचे पिस्तूल आणि एक काडतूस सापडल्याचे पोलिसांनी सांगितले.

अमन जमील खान (वय २७, रा. फ्लॅट नं. ४०४, सुप्रीम लिम्रा सोसायटी, इनामदार नगर, कोंढवा खुर्द) असे अति आरोपीचे नाव आहे. तर, वसीम शकील खान उर्फ वस्सु (रा. मक्का मशीदजवळ, भाग्योदयनगर, कोंढवा खुर्द) हा पदर झाला आहे. अमन याने वसीमकडून हे पिस्टल घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडे



५० हजार रुपये किमतीचे एक काळ्या रंगाचे देशी बनावटीचे लोखंडी पिस्टल आणि ५०० रुपये किमतीचे एक जिवंत काडतूस असा एकूण ५०,५०० रुपयांचा ऐवज हस्तगत करण्यात आला.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस, गुन्हे शाखेचे निरीक्षक संतोष चौधरी आणि प्रशांत मंडले यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक रवींद्र गावडे, सागर पवार तसेच अन्य पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने ही कारवाई केली.




हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक **युनूस खान** यांनी माइलस्टोन मिडिया, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय लोकनिष्ठ, ६१ जीएम प्लाझा, आरटीओ ऑफीसच्या बाजुला, रेल्वेस्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर–४३१००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. संपादक : **युनूस खान**, मो. क्र. **9890190231**, RNI - MAHMAR/2023/87332